Vol 4 Issue 12 Jan 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-4 | Issue-12 | Jan-2015
Available online at www.isrj.org

# दलित कथेमधून आलेले भटक्या–विमुक्तांचे जीवनचित्रण

*महादेव देशमुख*

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.

***सारांश*** **:-**मराठी कथांमधून विविध विषय येतात. ग्रामीण कथामधून ग्रामीण विषय त्यांचे जगण्याचे संदर्भ तर दलित कथांमधून उपेक्षित, वंचितांचे जगण्याची लोकरहाटी ध्यानात येते. दोन्ही प्रकारांमधून भटक्या-विमुक्तांचे चित्रण आलेले दिसते. भटक्या-विमुक्तांमध्ये गांवोगांवी भटकणारे रामोशी, डोंबारी, पारधी, गोपाळ, कुडमुडे जोशी, नंदीवाले, कोल्हाटी, वडार, वैदू इत्यादींचे जीवनचित्रण कथांमधून आलेले आहे. आता आपण डोंबारी या भटक्या-विमुक्त जमातीचे व्यवसाय सापेक्ष स्वरूप ध्यानात घेतले तर त्यांचा गावगाड्याशी आवश्यक व्यवसाय करणाऱ्या गुन्हेगारी आणि मनोरंजन करणाऱ्या जमाती इत्यादींचा समावेश होताना दिसतो.

***प्रस्तावना :***

गावगाड्यात सुगीच्या दिवसात शेतीची कामे झाल्यानंतर गावातील लोकांसाठी करमणूक करणारा 'डोंबारी' हा एक अत्यंत महत्त्वाचा भटका समाज आहे. 'दोरीवरचे काळीज' या के. ओ. गिऱ्हे यांच्या कथासंग्रहात याच नावाच्या कथेत 'डोंबारी' समाजाच्या व्यवसायातील कसरतीचे चित्रण येते, " सारजाने चोपून चोपून लुगडं नेसलं. पदर नीट आडपून घेऊन कंबरेला पट्टा बांधला. गावातील कर्त्याहर्त्यांना मुजरा केला आणि हातावर उद्या घेत फिरत आली. तिने आपल्या अंगाची कमान केली. उलट्यापालट्या उड्या हाणल्या. गावातील मंडळी टाळ्या देऊ लागली. कोणी असे म्हणत, कोणी तसे म्हणत, शेवटी सारजाने दोनरावर चालण्याचे काम सुरू केले. सरसर मांजरासारखी उभ्या बांबूवरून दोरावर आली. हातात वेळूची काठी घेतली. साहबानं पुन्हा दोराला झोके घेऊ लागली. पोरासोरांनी टाळ्या वाजविल्या. सरसर दोरावर चालली काम झाले, ती पटकन खाली उतरले." डोंबाऱ्याच्या खेळातील स्त्रियांची कसरत व मुलांच्याद्वारे केले जाणारे खेळ सर्वांचे आकर्षक असतात. तारेवर चालणे, केसांनी दगड उचलणे, बाटलीवर फळी ठेवून उभे राहणे इत्यादी स्त्रियांनी केलेली कसरत व लहान मुलाला हवेत उंच फेकणे, तळहातावर उंच काठी ठेवून त्या काठीवर मुलाला तरंगत ठेवणे हे खेळ कमालीचे साहसपूर्ण असतात. पोटापाण्यासाठी आपल्या जीवाचीही पर्वा न करता डोंबारी समाज हे कसरतीचे प्रयोग करतात. सतत भटकंती, घर नाही, दार नाही, गांव नाही, दारिद्र्या, अज्ञान यामुळे डोंबारी समाज दयनिय स्थितीत जीवन जगतो आहे. डोंबारी समाजाला आपल्या व्यवसायाविषयी अभिमान वाटतो. उपरोक्त के. ओ. गिऱ्हे यांच्या कथेतील साहेबा डोंबारी म्हणतो, "बापा, जन्माला आल्यापासनं आमची जात खेळ करती, ती माकडागत चिगट. आमचा डोंबाऱ्याचा खेळ वाडवडलांचा हा धंदा सोडला तर पोराला बायको दियाची न्हाय जात. पोरीला नवरा मिळायचा न्हाय. मी माझ्या जातीचा पंच, मला खेळ सोडायचा न्हाय, जात सोडायची न्हाय." जातीनिष्ठ व्यवसाय हा परंपरेचा भाग म्हणून पाहण्याची डोंबारी समाजाची मानसिकता इथे व्यक्त होते. 'जातपंचायत' ही डोंबारी समाजात आहे. जातपंचायतीतील प्रमुखाला 'पाटील' या नावाने ओळखले जाते. जमातीतील वाद-विवाद इत्यादी संदर्भात न्याय निवाडा जातपंचायतीत केला जातो, बहिष्कृत करणे, वाळीत टाकणे इत्यादी शिक्षा दिल्या जातात. इतर भटक्या समाजांमधील जातपंचायती सारखेच स्वरूप डोंबारी समाजातील जातपंचायतीचे आहे.

***गोपाळ –***

दलित कथा वाङ्मयात 'गोपाळ' समाजाचे चित्रण येते. मुख्यतः के. ओ. गिऱ्हे यांच्या 'दोरीवरचे काळीज' या कथासंग्रहामध्ये गोपाळ समाज, त्याची संस्कृती, रीतिरिवाज, परंपरा, व्यवसाय, भाषा या विषयीचे विवेचन केलेले आहे. के. ओ. गिऱ्हे हे स्वतः गोपाळ समाजातील असून पालावरील गोपाळ समाजाचे जीवन त्यांनी अनुभवलेलं आहे.

समाजातील श्रध्दा–अंधश्रध्दा, भटकंती, अज्ञान–दारिद्र्‌या या विषयी त्यांच्या लेखनात तळमळ तर दिसतेच त्याबरोबर गोपाळ समाजाच्या सांस्कृतिक बदलाविषयीची प्रखरताही व्यक्त होते. के. ओ. गिऱ्हे 'एका मृत्यूचा प्रवास' या कथेत लिहितात, 'वडीलांच भटकणं' आजही मला आठवतयं, तीन–तीन दिवसात आम्हांला गाव बदलावं लागायचं. तीन दिवसापेक्षा जास्त गावात आम्हांला राहू देत नसे. कोणत्या गावाला जायचंय हे कोणालाच माहित नसे. वाटेल तेथे भटकायचं सर्व दिशाहीन जगणं. पूर्वी पाटीलकीच्या काळात असा हुकुमच असल्यामुळे तीन दिवस गोपाळ समाज पाल करून राहत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून फिरणारा गोपाळ समाज आपला व्यवसाय सांभाळून उदरनिर्वाह करतो. प्रदेशपरत्व त्याने काही नावे अथवा संस्कृतीत बदल केलला असला तरी गोपाळांची समाजव्यवस्था बंदिस्त आहे. 'जातपंचायती' चे अस्तित्व गोपाळ समाजही असल्यामुळे जातीविषयक नियम काटेकोरपणे पाळले जातात. गोपाळ समाजातील जातपंचायत फ्रत वाद–विवादाच्या वेळीच बसत नाही तर विवाह सण–समारंभ, प्रमुख विधी यात ही जात–पंचायतीचा सहभाग असतो. त्यामुळे गोपाळ समाजात जातपंचायतीला विशेष महत्व आहे.

गोपाळ समाजाची सामाजिक घडण लक्षात घेतली त्याबरोबरच गोपाळ समाजाची संस्कृती सुध्दा वैशिष्ट्यापूर्ण आहे. तद्विषयी विचार करणे गरजेचे वाटते. के. ओ. गिऱ्हे यांच्या 'दोरीवरचं काळीज' या कथासंग्रहात गोपाळ समाजाची धार्मिक विधी, लग्नविधी आणि मर्तिकविधी विषयीच्या कथा येतात. गोपाळ समाज धार्मिकवृत्तीचा आहे. वर्षातून तो देवी–देवतांची पूजा करतो, यात्रा भरवून बकरे कापले जाते व मोठ्या रूपात जत्रा भरते. 'दसरा' या कथेत गोपाळ समाजातील धार्मिक विधी संदर्भात चित्रण येते. के. ओ. गिऱ्हे लिहितात, "दसरा सण गोपाळामध्ये महत्त्वाचा मानला जातो, सहा महिन्यापासून पै पै जोडून गोपाळांनी बकरे घेतले. कानसेकाराच आईच्या नावाने हे बकरे कापली जातात. कोणी पाच दिवसाचा तर कोण सात ते नऊ दिवसाची देवी बसवतात. आता नवव्या दिवशी दसरा होतो. घरापुढे बोकड कापले जाते, रिती–रिवाजाप्रमाणे घराच्या शेजारी बोकडाचे चार पाय, एक डोक ठेऊन त्या बोकडाचा रक्ताचा टिळा देवाला दिला जातो. मानसेकराच्या आईच मार्गानं पाच–पाच दगड मांडले. डफळ्यावाला बोलवले. देवीची वाट मळविण्यासाठी नवरा–बायको पदराच्या गाठी बांधून उभे होते. देवीची पूजा पती–पत्नीनं सोबतच करावी अशी गोपाळांमध्ये प्रथा आहे. वाट मळताना मागे पुढे दोघेजण धोतरांची सावली धरतात व वाजत गाजत 'लगलाई लो, पतलाई जो, मानकेसराच्या आई गोंधळी लो' असे गाणे म्हटले जाते, पूजा संपते, लोक माघारी येतात, नऊ दिवसाचा उपवास बायांनी धरलेला, पालापुढं सर्व जण जेवायला बसले." गोपाळ समाजातील हा धार्मिक विधी प्राधान्याने ग्रामीण परिसरातील इतर भटक्या–समाजातील यात्रेप्रमाणे आहे. यावरून गोपाळ समाज धार्मिक वृत्तीचा, श्रध्दा–अंधश्रध्दा, उपवास पाळणारा चित्रित होतो. गोपाळ समाजात लग्नविधीला पवित्र असे स्थान आहे. जातपंचायतीसमोर लग्न जुळतात व मोडतात. एकूण तीन दिवस लग्नसोहळा चालतो. एकापेक्षा जास्त बायका करण्यासाठी पध्दत गोपाळ समाजात असून 'घडाघागर' म्हणजे घटस्फोट घेऊनच दुसरे ग्न करता येते. एकूणच गोपाळ समाजाच्या लग्नविधीत जात–पंचायतीला विशेष महत्व आहे. गोपाळ समाजातील मर्तिक विधीसुध्दा वेगळा आहे. के. ओ. गिऱ्हे यांच्या 'एका मृत्यूचा प्रवास' या कथेत त्याविषयी चित्रण येते. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याची दाढी चांदीच्या वस्तऱ्याने काढण्याची पध्दत यांच्यात आहे अन्यथा जात–पंचायतीस बकरा मारून जेवण द्यावे लागते. मृत व्यक्तीला झोळीत घालून नेले जाते आणि जमिनीमध्ये खड्डा खोदून त्यात पुरले जाते. तीन दिवसानंतर बकरा कापतात, त्याप्रमाणे बकरा कापला अन मातीवर निवद घेऊन गेलो. सगळ्यांनी मातीच्या वट्याला हात लावला. म्या खांद्यावर घागर भरून आणली अन बाच्या मातीला सात फेऱ्या मारीत असतानाच मधूनच कोणी तरी घागरीला खडे मारायचे. तसे त्या घागरीला भोक पडलं, पाणी माझ्या अंगावर पडायचं सात फेऱ्या झाल्या अन गाडगं बाच्या मातीच्या जवळ फोडलं. हा कार्यक्रम आटपून पालावर आलो, कोणी दारू पित होते, मटन खात होते, हा कार्यक्रम आटपला. काहीसा हिंदू धर्म पध्दतीचा मर्तिक विधी गोपाळ समाजात आहे. गोपाळ समाजाची भाषासुध्दा दलित कथेत येते. गोपाळ समाज भटका असला तरी सामाजिक, सांस्कृतिक व भाषिकदृष्ट्या तो आपले वेगळेपण टिकवून आहे.

### वैदू –

महाराष्ट्र शासनाने जी भटक्या–विमुक्तांची यादी केलेली आहे. त्यामध्ये वैदू समाज हा एक भटका समाज म्हणून नोंदविला आहे. "वैदू समाज प्रामुख्याने आंध्र प्रदेशातून पोट भरण्याच्या निमित्ताने भटकत महाराष्ट्रात आला. त्यांची मातृभाषा तेलुगू असून त्या प्रदेशाच्या रूढी, परंपरा तो पाळतो." असे रामनाथ चव्हाण यांनी मांडलेले आहे. वैदू समाजातील स्त्रिया व पुरूषांचे व्यवसाय स्वतंत्र आहेत. भर दुपारच्या उन्हात तीन–चार महिन्याचे पोर पाठकुळी बांधून, काखेत झोळी, एका हातात रंगबेरंगी मण्याची पोत, मनी, मनगटी, पाळे, आडव्या काखेला अडकविलेले, डोक्यावर कसल्याशा मळकट गोधडीवजा चंबूसारखे बांधलेले गाठोडे, अनवानी पायाने गावात सुया घे, पोत घे, बिबे घ्या म्हणत फिरणाऱ्या बाया या वैदू समाजातील असतात. तसेच पुरूष तुंबडी लावणार, वाईवर, वातावर औषध असे ओरडत फिरणारा वैदू पुरूष दिसतो. अलीकडे शहरामध्ये चौकात अथवा बस स्टॅण्ड इत्यादी ठिकाणी झोपडीवजा पालं टाकून त्यावर विविध औषधांची नांवे, साहित्य मान्यवर व्यक्तीबरोबर फोटो काढून टांगलेले अशा अवस्थेत वैदू समाज समाजात वावरतो. तसेच डबे करणार, बुडे बसविणार म्हणत भली मोठी ट्रंक घेऊन फिरणारा व्यक्तीसुध्दा 'वैदू' समाजातील असतो. इतर भटक्या समाजाप्रमाणेच वैदूंमध्येही पोटजाती आहेत. त्यामध्ये दासर वैदू, नंदीबैलवाले वैदू, मद्‌योड वैदू, मंदलोड वैदू असे चार पोटजातीचे प्रकार होत. प्रत्येक पोटजातीचा व्यवसाय वेगवेगळा असून यांच्यामध्ये रोटभ्बेटी

व्यवहार होत नाहीत. प्रत्येक पोटजात ही दुसऱ्या पोटजातीपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजते. त्यांच्या व्यवसायावरूनही जातीचे वर्गीकरण सांगितले जाते. 'दासर वैद' लोक प्रामुख्याने सुया, पोत, बिब्बे विकतात तर 'नंदीबैलवाले वैदू' नंदीबैलाचा खेळ करून आपली उपजीविका करतात तर डबे, बादल्या तयार करणार, डबे बादल्या दुरूस्त करणारे ते 'मदयाड वैदू' म्हणून ओळखले जातात तर 'मंदलोड वैदू' हे औषध विक्रीचा प्रमुख व्यवसाय करतात. व्यवसायापेक्षा जीवन जगणारा वैदू समाज सतत गावोगांव भटकंती करतो. पालावरील जीवन जगताना त्याला गावगाड्यातील अन्याय-अत्याचारांनही सामोरे जावे लागते. भटके समाज प्राधान्याने प्राणी पाळतात, हे त्यांच्या जीवनाची गरज आणि एक अविभाज्य भागच बनलेला आहे, वैदू लोक कुत्री पाळतात. शंकरराव खरात यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहातील 'माया' ही कथा वैदूचे कुत्र्यावरील प्रेम व्यक्त करते. पाटील ज्यावेळेस वैदूकडील कुत्रे मागतो, तेंव्हा वैदू म्हणतो, "पाटला ! तु माजा जीव मागितलास बग !" यावरून वैदूचे पाळीव प्राण्यावरील अतुट प्रेम व्यक्तहोते. एकूणच वैदू समाजाची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेता वैदू समाज सतत भटकंती करत पालावरील जीवन जगतो. व्यवसाय केंद्री जीवन पध्दती असून सतत भटकंतीमुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य नाही. दारिद्र्या, अज्ञान, अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात वैदू समाजात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात काही भटके समाज शहरांमध्ये स्थिर झाले, शहराच्या बाहेर त्यांनी आपल्या वस्त्या बसविल्या. वैदू समाजानेही आपली वस्ती बसविली, तिला 'वैदूवाडी' असे म्हणतात. मात्र इथे फक्त दहा ते पंधरा टक्के लोक राहतात. बाकीचे सर्वजण आजही व्यवसाय फायदा या समाजाला मिळालेला नाही. वैदूची भाषा ही वैशिष्ट्यापूर्ण असून मातृभाषा तेलुगू असल्याचे रामनाथ चव्हाण सांगतात. के. ओ. गिऱ्हे यांच्या कथेमध्ये वैदूंचे जीवन चित्रणाबरोबर त्यांची भाषा ही अभिव्यक्त होते. मात्र ती ग्रामीण मराठी सदृश्य भाषा आहे.

एकूणच सर्व भटक्या-विमुक्त जमातींची भाषा बोली व सांकेतिक स्वरूपाची असते असे आपणाला सकृतदर्शनी दिसते.

*संदर्भ ग्रंथ*

(१)के. ओ. गिऱ्हे, दोरीवरचं काळीज, गिऱ्हे प्रकाशन, लक्ष्मी कॉलनी, प्रज्ञानगर, छावणी, औरंगाबाद, प्र. आ. डिसेंबर १९९९, पृ. ४१.
(२)लक्ष्मण माने, विमुक्तायन, उ. नि. पृ. ७७.
(३)के. ओ. गिऱ्हे, उ. नि. पृ. २८.
(४)तत्रैव, पृ. २८.
(५)तत्रैव, पृ. १३.
(६)के. ओ. गिऱ्हे, उ. नि. पृ. ५४.
(७)तत्रैव, पृ. १५.
(८)रामनाथ चव्हाण, जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन, पुणे, पृ. ८४.
(९)शंकरराव खरात, सांगावा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०, पाचवी आ. १९९३, पृ. १७.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org